| MHRG040010992024 | **विशेष दिवाणी दावा क्र. १६३/२०२४**<br>मथुरा भोमकर व इतर वि. रमेश भोमकर वगैरे |
|---|---|

## <u>अर्ज नि. ५४ वरील आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता व मनाई हुकूमाचे आदेशाकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्ज प्रतिवादी क्र. ८, ९, ११ ते १३ यांनी कैफियत दाखल करण्यास ३० दिवसांचा झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दिलेला आहे.

०२. यांत प्रतिवादी क्र. ८, ९, ११ ते १३ यांचे थोडक्यात म्हणणे असे की, प्रतिवादीला दिनांक २८/०३/२०२५ रोजी समन्सची बजावणी झाली होती. प्रतिवादीने ९० दिवसांच्या कालावधीमध्ये म्हणजेच दि.२८/०६/२०२५ रोजीपर्यंत कैफियत दाखल करणे आवश्यक होते. सदर दावा वादीने एकूण १८ मिळकतींकरीता दाखल केलेला आहे. सबब सदर सर्व मिळकतींची सर्व माहिती व कागदपत्र काढून त्याबाबतची माहिती गोळा करणे करीता सदरचा वेळ प्रतिवादीस लागलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.८, ९, ११ ते १३ वेळेत कैफियत दाखल करू शकले नाहीत. करीता, अर्ज दिला.

०३. वादी यांनी सदर अर्जावर लेखी म्हणणे दाखल करून कॉस्ट लावून योग्य ते न्यायाचे आदेश पारीत करणेत यावे.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, लेखी कैफियत दाखल करू शकले नाहीत. व त्यांना कैफियत दाखल करण्यास ३० दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरहू दाव्यातील स्वरूप व अर्जातील कारण तसेच विलंब लक्षात घेता मी या मताची

आहे की, प्रतिवादी क्र.८, ९, ११ ते १३ यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी संधी देणे योग्य व न्यायोचित आहे. करीता, अर्ज रक्कम रू.१,०००/– खर्चावर मंजुर करणे उचित असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. नि.क्र. ५४ वरील अर्ज खर्च रक्कम रू.१,०००/– (अक्षरी रूपये एक हजार मात्र) वादी यांना देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र. क्र.८, ९, ११ ते १३ यांनी खर्चाचे आदेश पूर्ण केल्यानंतर कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

३. अर्ज खुल्या न्यायालयातुन घोषित करण्यात आले.

VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Digitally signed by VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Date: 2025.12.10 16:37:57 +0530

पनवेल. (व्ही. आर. हंगरगेकर)

दिनांक – ०९/१२/२०२५. सह दिवाणी न्यायाशीश, व. स्तर, पनवेल.